स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त मएसोच्या आबासाहेब गरवारे महाविद्यालयात विविध विषयांवरील पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मएसोच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष राजीव सहस्रबुद्धे, मएसोचे सहायक चिटणीस प्रा. सुधीर गाडे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. पी. बी. बुचडे, उपप्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.








